महाराष्ट्र शासनाचा २००७-२००८ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी गुरुवार, दिनांक २२ मार्च २००७ रोजी
केलेले भाषण

## भाग पहिला

अध्यक्ष महोदय,

मी आपल्या अनुमतीने सन २००७-०८ या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

२. नुकत्याच पार पाडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आघाडीला मिळालेले यश हे आम्ही केलेल्या कामाबद्दल जनतेने दाखविलेल्या विश्वासाची पावती आहे, असे मी समजतो.

**स्थूल आर्थिक आढावा.**

३. स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय पातळीवर देशांतर्गत स्थूल उत्पन्न जे आधीच्या वर्षी ९ टक्के दराने वाढले होते ते २००६-०७ मध्ये ९.२ टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे. या तुलनेत स्थिर किंमतीनुसार महाराष्ट्राचे स्थूल राज्य उत्पन्न आधीच्या वर्षीच्या ९.२ टक्के वाढीच्या तुलनेत २००६-०७ मध्ये ९.३ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे.

**राज्याचे उत्पन्न.**

४. सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००६-०७ हे प्रकाशन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रचलित किंमतीनुसार २००५-०६ मध्ये राज्याचे निव्वळ उत्पन्न रुपये ३,८६,२४१ कोटी असून ते सन २००४-०५ मधील राज्य उत्पन्नापेक्षा १४.२ टक्क्यांनी जास्त होते. दरडोई राष्ट्रीय उत्पन्न सन २००५-०६ मध्ये रुपये २५,७१६ इतके अंदाजण्यात आले आहे तर महाराष्ट्राचे दरडोई राज्य उत्पन्न रुपये ३७,०८१ इतके आहे.

**किंमती निर्देशांक.** **५.** अखिल भारतीय घाऊक किंमतीच्या निर्देशांकावर आधारित वार्षिक चलन वाढीचा दर जानेवारी २००७ करिता ६.२ टक्के इतका होता. हा दर जानेवारी २००६ साठी ४.१ टक्के होता. एप्रिल २००६ ते जानेवारी २००७ या कालावधीकरिता अखिल भारतीय घाऊक किंमतीच्या सरासरी निर्देशांकांवर आधारित चलन वाढीचा दर ५.२ टक्के इतका होता. तो आधीच्या वर्षाच्या तत्सम कालावधीकरिता ४.६ टक्के होता.

**राजकोषिय स्थैर्यता.** **६.** राज्य हे राजकोषिय दृढीकरणावरुन आता राजकोषिय स्थैर्याच्या दिशेने जात आहे. गेल्या काही वर्षातील राज्याची महसुली जमेतील वाढ ही प्रभावी असून, महसुली खर्च लक्षणियरित्या कमी करण्यात आलेला आहे. सन २००३-०४ ते २००६-०७ (सुधारित अंदाज) या कालावधीत महसुली जमेत २०.५९ टक्के इतक्या वार्षिक सरासरी वृध्दी दराने तर, महसुली खर्चात १४.१४ टक्के इतक्या वार्षिक सरासरी वृध्दी दराने वाढ झाली असून, परिणामी महसुली तुटीत भरीव घट झालेली आहे. सन २००५-०६ मध्ये १८.१० टक्के इतक्या महसुली जमेच्या वृध्दीच्या तुलनेत सन २००६-०७ मध्ये ती २४.४२ टक्के इतकी अंदाजित करण्यात आली आहे. सन २००७-०८ मध्ये महसुली जमेत १३.३३ टक्के वाढ अंदाजित असून, महसुली खर्चात ६.८२ टक्के वाढ होईल, असे अपेक्षित आहे.

**महसूली जमेमध्ये वृध्दी.** **७.** राज्याचे सन २००६-०७ या वर्षाचे महसुली उत्पन्न राज्य स्थूल उत्पन्नाच्या वाढीपेक्षा अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. सन २००६-०७ च्या सुधारित अंदाजानुसार महसुली जमा रुपये ४०,३२३ कोटी अंदाजित आहे व त्याची वाढ २००५-०६ च्या तुलनेत २०.२३ टक्के इतकी आहे. सन २००७-०८ ची महसूली जमा १३.७७ टक्क्याने वाढ होईल अशी अपेक्षा आहे व त्याप्रमाणे ती रुपये ४५,८७४ कोटी अंदाजित केलेली आहे.

**७.१.** राज्याच्या स्वत:च्या कर महसुलाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेल्या टक्केवारीचे प्रमाण सन २००५-०६ मध्ये ७.७६ टक्केवरुन, सन २००६-०७ (सुधारित अंदाज) मध्ये ८.११ टक्के तर सन २००७-०८ (अर्थसंकल्पीय अंदाज) मध्ये ८.१२ टक्के इतके वाढले आहे. केंद्रीय विक्रीकराच्या दरात आता ४ टक्क्यावरुन ३ टक्के घट झाली आहे, अन्यथा सन २००७-०८ मध्ये यात अजून वाढ झाली असती.

**योजनेतर महसूली खर्चावर नियंत्रण.**

**८.** सन २००६-०७ च्या सुधारित अंदाजपत्रकानुसार योजनेतर महसूली खर्चातील वाढ आधीच्या वर्षाच्या तुलनेत १४.९८ टक्के इतकी आहे. सन २००७-०८ मधील योजनेतर महसूली खर्चात सन २००६-०७ च्या तुलनेत ४.१३ टक्क्यांनी वाढ असून, ती राज्य स्थूल उत्पन्नात होणाऱ्या वाढीपेक्षाही कमी आहे. २००५-०६ मधील योजनेतर महसुली खर्चाची महसुली जमेशी असलेली ९७.१३ ही टक्केवारी २००६-०७ मध्ये ८९.७६ टक्के आणि सन २००७-०८ मध्ये ८२.४७ टक्क्यांपर्यंत कमी होईल. मत्तांवरील देखभालीच्या तरतुदींमध्ये भरीव प्रमाणावर वाढ करुन देखील योजनेतर खर्चावरील नियंत्रण साध्य केले आहे. हे प्रामुख्याने प्रशासकीय खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे साध्य झाले आहे. वेतन, निवृत्तीवेतन आणि व्याज यावरील खर्चात सन २००५-०६ मधील ६८.४३ टक्के तर सन २००६-०७ मधील ६१.७९ टक्केच्या तुलनेत सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार ५९.८२ टक्के इतकी घट अंदाजित करण्यात आली आहे.

**राजकोषिय व्यवस्थापन.**

**९.** महसूली जमेचे बाह्य कर्ज व कर्जाच्या परतफेडीशी असलेले वाढते गुणोत्तर ही बाब राज्याचा दृष्टीने चिंतेचा विषय झाली आहे. उत्तम राजकोषिय व्यवस्थापनद्वारे राज्याच्या बाह्य

कर्जाच्या राज्य स्थूल उत्पन्नाशी सन २००५-०६ मध्ये असणारी २८.७६ टक्केवारी सन २००६-०७ मध्ये २७.०५ टक्के पर्यंत कमी करणे शक्य झाले आहे. त्यापुढे सन २००७-०८ मध्ये हे प्रमाण २५.५३ टक्के इतके कमी होईल, असे अंदाजित करण्यात आले आहे. महसुली जमेच्या तुलनेत कर्जाची टक्केवारी ही सन २००५-०६ मध्ये असलेल्या २५६ टक्क्यांवरुन २००६-०७ मध्ये २२३ टक्क्यांवर व सन २००७-०८ मध्ये २११ टक्क्यांपर्यंत अंदाजित करण्यात आली आहे. महसूली जमेची बाह्य कर्जाच्या परतफेडीशी सन २००५-०६ मध्ये असणारी ३६.१४ टक्के इतकी टक्केवारी व सन २००६-०७ मध्ये ३०.४१ टक्के इतकी कमी होऊन ती सन २००७-०८ मध्ये २९.११ टक्के पर्यंत कमी होईल, असे अंदाजित करण्यात आले आहे. महसुली तुटीची महसूली जमेशी असलेली टक्केवारी सन २००४-०५ मधील २४.४६ टक्क्यांवरुन २००५-०६ मध्ये ७.९३ टक्के होऊन सन २००६-०७ मध्ये ५.३० टक्के पर्यंत कमी होईल, असे अंदाजित करण्यात आले असून, सन २००७-०८ मध्ये महसुली आधिक्य अपेक्षित आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीचा दर व महसुलातील वाढ अशीच चालू राहील्यास कर्जाच्या परतफेडीस कोणतीही अडचण येणार नाही असा मला विश्वास आहे.

**९.१.** सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकात रुपये ३०५.८३ कोटी इतके महसुली अधिक्य अंदाजित करण्यात आले होते. तथापि, सलग दुसऱ्या वर्षी देखील संपूर्ण राज्यात आलेला महापूर, वीज अनुदान वाढीमुळे पडलेला भार, शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याकरिता दिलेले अतिरिक्त अर्थसहाय्य अशा प्रकारच्या अनपेक्षित बाबींमुळे सन २००६-०७ मध्ये रुपये ३,१९२.४९ इतकी महसूली तूट अंदाजित करण्यात आली आहे. केंद्र शासनाकडून सन २००५-०६ या वर्षाकरिताची मूल्यवर्धित

कराच्या प्रतिपूर्तीपोटी मिळणारी रुपये १,२०० कोटी इतकी रक्कम चालू आर्थिक वर्षात मिळण्यास राज्य शासन पात्र झाले असून ही रक्कम दिनांक ३१ मार्च, २००७ पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित आहे. तथापि, मी ही रक्कम हिशेबात घेतलेली नाही. चालू आर्थिक वर्षात ही प्रतिपुर्तीची रक्कम प्राप्त झाल्यास सन २००६-०७ मधील महसूली तूट त्याप्रमाणात कमी होईल. जरी या वर्षात राज्याने महसुली आधिक्य प्राप्त केलेले नसले, तरी सन २००४-०५ मधील रुपये १०,०३३ कोटी व सन २००५-०६ मधील रुपये ३,८४२ कोटी इतक्या महसुली तुटीच्या तुलनेत सन २००६-०७ मध्ये तूट कमी करण्यात यश प्राप्त केले आहे.

**९.२.** यासंदर्भात मला सभागृहास सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, आम्ही सन २००६-०७ मध्ये करण्यात येणाऱ्या खर्चामध्ये प्रशासकीय कपात न लावण्याची पध्दत सुरु ठेवली असून, विभागास आवश्यक तितका निधी मासिक निधी वितरण पद्धतीने अधिक सुलभतेने वितरित करण्यात आला आहे.

**सन २००७-०८ मधील महसुली अधिक्य.**

**१०.** मला सभागृहास सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, सन २००७-०८ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये ५१०.६८ कोटी इतकी महसुली शिल्लक अपेक्षित आहे.

**एकूण खर्चाच्या तुलनेत योजनांतर्गत खर्चाची टक्केवारी.**

**११.** एकूण खर्चाच्या तुलनेत योजनांतर्गत खर्चाची टक्केवारी सन २००२-०३ ते सन २००४-०५ मध्ये कमी होती. तद्नंतर त्यात सतत वाढ होत आहे. एकूण खर्चाचे योजनांतर्गत खर्चाशी सन २००४-०५ मधील १५.१६ टक्के असलेले गुणोत्तर सन २००५-०६ मध्ये १७.८८ टक्के इतके वाढले. हे सांगण्यास मला आनंद होत आहे की, हे प्रमाण सन २००६-०७ मध्ये २२.३२ टक्के व सन २००७-०८ मध्ये २५.२५ टक्के होण्याची अपेक्षा आहे.

**वार्षिक योजना २००७-०८.** **१२.** मला सभागृहास सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, सन २००७-०८ ची वार्षिक योजना रुपये २०,२०० कोटी इतक्या रकमेची असून, सन २००६-०७ च्या वार्षिक योजनेपेक्षा ३६ टक्क्यांनी जास्त आहे. योजनेत ही वाढ करीत असतांना राजकोषिय तूटही कमी करण्यात आली आहे. सन २००५-०६ या वर्षाकरिता अंदाजित रुपये १७,६३० कोटी एवढी राजकोषिय तूट, सन २००६-०७ मध्ये रुपये १५,६१९ कोटी पर्यंत कमी झाली व ती सन २००७-०८ मध्ये रुपये ११,१५७ कोटी पर्यंत कमी होईल, अशी अपेक्षा आहे. सन २००५-०६ करिताची राजकोषिय तूट ही राज्य स्थूल उत्पन्नाच्या ४.०८ टक्के इतकी आहे. ती सन २००६-०७ मध्ये ३.१४ टक्के इतकी कमी होईल असा अंदाज आहे व तद्नंतर सन २००७-०८ मध्ये ती १.९७ टक्के इतकी असेल.

**१२.१** सन २००७-०८ च्या वार्षिक योजनेच्या उपलब्ध नियतव्ययापैकी रुपये १८,३३६ कोटी नियतव्यय अर्थसंकल्पीत झाला असून त्यापैकी महसूली खर्चासाठी रुपये १०,१७० कोटी व भांडवली खर्चासाठी रुपये ८,१६६ कोटी आहेत. अर्थसंकल्पीत न झालेला नियतव्यय रुपये १,८६३ कोटी असून, त्याची महसूली व भांडवली खर्चाची विगतवारी अनुक्रमे रुपये १,१२७ कोटी व रुपये ७३६ कोटी आहे.

**१२.२** या वर्षीच्या वित्तीय प्रकाशनात बिगर अर्थसंकल्पीत योजनांतर्गत नियतव्यय नियोजन विभागांतर्गत ठोक तरतुदीद्वारे दर्शविण्याचे मी ठरविले आहे. जेव्हा संबंधित विभागाकडून नियतव्यय अर्थसंकल्पीत होईल, तेव्हा नियोजन विभागातंर्गतच्या ठोक तरतुदीमधून समायोजित करण्यात येईल.

**१२.३** या ठोक तरतूदीची महसूली व भांडवली खर्चाची वर्गवारीही समाविष्ट केलेली आहे. यामुळे अर्थसंकल्पात जास्त पारदर्शकता येऊन वर्षाच्या सुरवातीसच महसुली व राजकोषिय तुटीचा वास्तववादी अंदाज येऊ शकेल.

**१२.४** सन २००७-०८ च्या वार्षिक योजनेतील प्रस्तावित नियतव्यय हा राज्याच्या साधनसंपत्तीशी सुसंगत असून, ही योजना वास्तववादी आहे.

**पाणी पुरवठा, रस्ते, जलसिंचन, शालेय शिक्षण व ऊर्जा क्षेत्रावर भर.**

**१३.** सन २००७-०८ च्या वार्षिक योजनेत पायाभूत सुविधा व सामाजिक क्षेत्र याकडे विशेष लक्ष देण्यात आले असून यासाठी जास्त नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे. यामुळे राज्यातील जनतेचे राहणीमान उंचावले जाऊन विकासाचे फायदे ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचतील. जलसिंचनाकरिता रुपये ४,५२१ कोटी, पाणी पुरवठ्याकरिता रुपये ९८३ कोटी, शालेय शिक्षणाकरिता रुपये ५९९.७८ कोटी, उर्जा क्षेत्रासाठी रुपये १,२८२ कोटी व रस्त्यासाठी रुपये ६८५ कोटी नियतव्यय निश्चित करण्यात आला आहे. शासन रस्ते विकासाची अनेक कामे ही खाजगीकरणाच्या माध्यमातून हाती घेणार असल्यामुळे रस्ते विकास क्षेत्रातील गुंतवणुकीत अजूनही वाढ होईल.

**जिल्हा योजनेकरिता भरीव तरतूद.**

**१४.** जिल्हा योजनेच्या माध्यमातून, लघुपाटबंधारे तलाव, पाणी पुरवठा योजना, जलसंधारणाची अपुरी कामे पूर्ण करण्यावर गेल्या दोन वर्षात भर देण्यात आला होता. गेली काही वर्षे जिल्हा योजनेचा आराखडा रुपये ७०० कोटीच्या आसपास होता. सन २००६-०७ या वर्षात यासाठी अतिरिक्त रुपये २०० कोटी उपलब्ध करण्यात आले. जिल्हा योजनेच्या माध्यमातून होणाऱ्या कामांची उपयोगिता लक्षात घेता त्यात २० टक्के वाढ करण्याचे मी प्रस्तावित करीत आहे. त्यामुळे सन २००७-०८ या वर्षाचा जिल्हा योजनेचा आराखडा रुपये १,०८० कोटी इतका होईल.

**अनुशेष.** १५. गेल्या ४ वर्षात, सिंचन वगळता इतर आठ विकास क्षेत्रातील अनुशेष भरुन काढण्याकरिता वार्षिक योजनेत रुपये १,००० कोटी पेक्षा जास्त रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उपलब्धतेनुसार खर्च न झाल्यामुळे, परिस्थितीचा आढावा घेण्याकरिता माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. योजना राबविताना काही प्रशासकीय व तांत्रिक अडचणी असल्याचे समितीस आढळून आले आहे. अनुशेष दूर करण्यासाठी उपलब्ध तरतूद पूर्ण खर्च करण्यात येणाऱ्या अशा अडचणीवर मात करण्यास शासन कटीबध्द आहे. या आठ विकास क्षेत्रांकरिता सन २००७-०८ या वर्षात रुपये १,४०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. यात आरोग्याकरिता रुपये ४८३.९२ कोटी, रस्त्यांकरिता रुपये ३२७.९६ कोटी, शेती पंपाच्या विद्युतीकरणासाठी रुपये २८१.७५ कोटी आणि तंत्र शिक्षणाकरिता रुपये १६२.०७ कोटी समाविष्ट आहेत.

**पाटबंधारे क्षेत्रात खर्चाचे व्यवस्थापन.** १६. आंतरराज्यीय लवादाच्या निर्णयाचा विचार करता पाणी अडविण्यासाठी शासनास मोठया प्रमाणावर पाटबंधारे प्रकल्प हाती घ्यावे लागले. परिणामी, प्रत्येक वर्षी अपेक्षित सिंचन क्षमता निर्माण होत नसतांनाही उपलब्ध साधनसंपत्ती अनेक पाटबंधारे प्रकल्पांवर थोडया थोडया प्रमाणात वितरित करावी लागली. हे लक्षात घेता आता उपलब्ध साधनसंपत्ती अंतिम टप्प्यातील प्रकल्पांवर प्राधान्याने खर्च करुन जास्तीत जास्त सिंचन क्षमता निर्माण करण्याचे आम्ही ठरविले आहे. मा. राज्यपाल महोदय यांनी निश्चित केलेल्या सुत्राच्या चौकटीत राहून, सिंचन क्षेत्रात, जलसंपदा विभागाद्वारे व पाटबंधारे महामंडळाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांकरिता प्रकल्पनिहाय

नियतव्ययाचे वाटप करण्यात आले आहे. परिणामस्वरुप पुढील वर्षात अंदाजित दोन लक्ष इतके अतिरिक्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात येणार आहे

**आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत.**

**१७.** राज्यामध्ये जुलै ते सप्टेंबर २००६ मध्ये अतिवृष्टी व महापूर यामुळे शेतीपिकांचे /फळबागांचे ५० टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या सुमारे १५ लाख १५ हजार आपदग्रस्त शेतकऱ्यांना रूपये ४७३.४७ कोटी इतकी मदत देण्यात आली.

**विदर्भातील सहा जिल्हां करिता विशेष पॅकेज.**

**१८.** महाराष्ट्राच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा अत्यंत चिंतेचा मुद्दा आहे. या आत्महत्यांची कारणमिमांसा व मुलभूत कारणांचा शोध घेवून त्यावर उपाययोजना म्हणून राज्य शासनाने विदर्भातील सहा जिल्हयांसाठी विशेष पॅकेजची अंमलबजावणी केली. शेतकऱ्यांच्या विकासासाठी या पॅकेजअंतर्गत पुढील योजना राबविण्यात आल्या आहेत :-

**(अ)** राज्यात उद्‌भवलेल्या विविध नैसर्गिक आपत्तीमुळे सन २००५-०६ मध्ये राज्यात कापूस उत्पादनात मोठी घट झाली, राज्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने एक विशेष बाब म्हणून प्रति हेक्टरी रुपये १,००० याप्रमाणे २ हेक्टर पर्यंत मदत रोखीने देण्याचा निर्णय घेतला आहे. याकरिता रुपये ३०० कोटी इतका निधी देण्यात आला असून याचा लाभ सुमारे २४ लक्ष शेतकऱ्यांना मिळाला आहे. तसेच, राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता शासनाने सन २००६-०७ च्या हंगामासाठी प्रतिहेक्टरी रुपये १,५०० याप्रमाणे दोन हेक्टरपर्यंत रोखीने मदत देण्याचे ठरविले असून, या प्रयोजनार्थ रुपये ५० कोटी तातडीने आकस्मिकता निधीतून उपलब्ध केले असून, सन २००७-०८ करिता रुपये ४५० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे

**(ब)** विदर्भातील सहा जिल्ह्यातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या ६०,००० शेतकऱ्यांना उत्तम शेती करता यावी, यासाठी सन २००५-०६ पासून पुढील ३ वर्षात प्रत्येक शेतकऱ्याला एकूण रुपये २५,००० पर्यंत मदत देण्यात येणार आहे. या योजनेकरिता प्रतिवर्षी रुपये ५० कोटीचा नियतव्यय निश्चित केला आहे. या योजनेमध्ये जमीन सुधारणा, बी-बियाणांकरिता अनुदान, पीक संरक्षण/शेतीची सुधारित अवजारे, इनवेल बोअरिंग, पाईप लाईन इत्यादी घटक समाविष्ट आहेत.

**(क)** राज्य शासनाद्वारे सेंद्रीय शेती प्रकल्प राबविण्यात येत असून, यासाठी सन २००६-०७ या वर्षात रुपये ५.९८ कोटी इतका खर्च झाला असून, सन २००७-०८ या वर्षाकरिता रुपये ७.९५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**(ड)** विदर्भातील सहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांची हलाखीची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता शेतकऱ्यांच्या स्वयंसहाय्यता गटांना शेती संलग्न जोड धंद्याकरिता संकरित गाई, शेळी-मेंढी व कोंबडयांचे गट उपलब्ध करुन दिले आहेत. या प्रयोजनार्थ सन २००६-०७ मध्ये रुपये ३० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**(इ)** शासनाने विदर्भातील ६ जिल्ह्यांमध्ये सामूहिक विवाहाची योजना हाती घेतली असून त्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास वस्तुरुपाने रुपये १०,००० ची मदत व या विवाहाचे आयोजन करणाऱ्या संस्थेस प्रोत्साहन म्हणून संयोजनाचा खर्च भागविण्यासाठी प्रत्येक जोडप्यामागे रुपये १,००० चे अनुदान देण्यात येते. या योजनेसाठी सन २००७-०८ साठी रुपये ५ कोटी तरतूद प्रस्तावित केली आहे.

**राष्ट्रीय कृषि विमा योजना.**

**१९.** राज्यातील पीक विमाधारक शेतकऱ्यांना सन २००५-०६ या वर्षातील खरीप व रब्बी हंगामात एकूण रुपये ३२.३२ कोटी इतकी रक्कम विमा नुकसान भरपाई पोटी अदा करण्यात आली आहे. तसेच, सन २००६-०७ मध्ये विदर्भातील ६ जिल्ह्यांकरिता असणाऱ्या विशेष पॅकेज अंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना कापूस व इतर पिकांकरिता असणाऱ्या विमा हप्त्यासाठी अनुक्रमे ७५ टक्के व ५० टक्के अनुदान देण्यात आले आहे. इतर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना विमा हप्त्याच्या ५० टक्के इतके अनुदान देण्यात आले आहे. यासाठी रुपये ९.८७ कोटी देण्यात आले आहे.

**१९.१.** सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना, तसेच विदर्भ पॅकेज अंतर्गत शेतकऱ्यांना विमा हप्ता अनुदानासाठी रुपये २१ कोटीची तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**सुक्ष्म सिंचन.**

**२०.** उपलब्ध व सीमित जलसाठ्याचा कमाल वापर करण्याची निकड लक्षात घेवून, केंद्र शासन पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन २००६-०७ पासून ५० टक्के अनुदानावर राबविण्यात येत आहे. सन २००६-०७ करिता केंद्र शासनाने रुपये १७४.६६ कोटी रकमेच्या कार्यक्रमास मंजुरी प्रदान केलेली आहे. फलोत्पादन पिकांकरिता व बिगर फलोत्पादन पिकांकरिता एकूण रुपये ९४.९३ कोटी इतका निधी जिल्हा यंत्रणेस उपलब्ध करुन देण्यात आला असून, एकूण ३०,१५२ हेक्टर क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आले आहे. सन २००७-०८ या वर्षासाठी या योजनेकरिता रुपये १०.०२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय फलोत्पादन अभियान.** **२१.** राष्ट्रीय फलोत्पादन अभियान ही महत्वाकांक्षी योजना राज्यात २३ जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी सन २००५-०६ या वर्षात रुपये ८२.६० कोटी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला आहे. अभियानाअंतर्गत दर्जेदार रोपे/कलमे उपलब्ध करण्यापासून ते उत्पादित माल ग्राहकापर्यंत पोचविण्याच्या कार्यक्रमाचा अंतर्भाव आहे

**२१.१.** सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी २९ जिल्हयांकरिता रुपये २३४.९१ कोटीच्या मंजूर आराखड्यापैकी केंद्र शासनाकडून रुपये ११३.२० कोटी निधी प्राप्त झाला असून, सदर निधी जिल्हास्तरावर वितरीत करण्यात आला आहे. यामध्ये विदर्भातील सहा जिल्ह्यांकरिता वितरित केलेल्या रुपये २१.२० कोटीचा समावेश आहे.

**ग्रामीण पतपुरवठा.** **२२.** राज्य शासनाने प्रा. वैद्यनाथन समितीच्या शिफारसींच्या अनुषंगाने राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक व केंद्र शासनाशी सामंजस्य करार केलेला आहे. कृषी क्षेत्रात अल्पमुदत कर्ज पुरवठा करणाऱ्या सहकारी यंत्रणेचे बळकटीकरण करणे हा या कराराचा मुख्य उद्देश आहे. यात पतपुरवठा यंत्रणेचे पुनर्भांडवलीकरण, तांत्रिक श्रेणीवाढ, यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी ह्यांचे प्रशिक्षण, विविध शासन अधिनियमांचे पुनर्विलोकन करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे, जेणेकरुन पतपुरवठा यंत्रणेला अधिक स्वातंत्र्य मिळेल व त्या स्पर्धात्मक होतील.

**सर्वशिक्षा अभियान.** **२३.** सर्वशिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत २६,६२० वर्गखोल्या, २४४ गटसाधन केंद्रे व २,९२३ समूह साधन केंद्रे बांधण्यात आली. राज्यातील १.८५ लक्ष अपंग विद्यार्थ्यांना अपंग समावेशित कार्यक्रमात

शस्त्रक्रियेकरिता सहाय्य व इतर मूलभूत सुविधा पुरविण्यात आल्या. सन २००६-०७ या वर्षात राज्य हिश्श्यापोटी रुपये २६४.०६ कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन २००७-०८ या वर्षात सदर अभियानांतर्गत ८,५२८ वर्गखोल्या, १९ गटसाधन केंद्रे, १,०७३ समूह साधन केंद्रे बांधण्याचे लक्ष्य असून, रुपये २७७ कोटी इतका नियतव्यय राज्य हिश्श्यापोटी प्रस्तावित करण्यात आला आहे.

क्रीडा.

**२४.** तिसरी राष्ट्रकूल युवा क्रीडा स्पर्धा श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल; बालेवाडी, पुणे येथे ऑक्टोबर, २००८ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे, ही महाराष्ट्रासाठी एक अभिमानाची बाब आहे. बालेवाडी संकुलातील क्रीडा सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी सन २००६-०७ मध्ये रुपये ६० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या प्रयोजनार्थ सन २००७-०८ या वर्षाकरिता रुपये ४० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**२४.१.** सन २००७-०८ साठी क्रीडा क्षेत्राकरिता रुपये १३१ कोटी इतका भरीव नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

पूर्व-माध्यमिक [व] माध्यमिक शिष्यवृत्ती संचामध्ये व [द]रामध्ये वाढ.

**२५.** इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी या स्तरावरील शिष्यवृत्ती संचामध्ये शासनाने दुप्पट वाढ करुन ते आता अनुक्रमे ७,९०८ व ७,६२८ इतके केले आहेत. या वर्षापासून शिष्यवृत्तीची मासिक रक्कम दरमहा रुपये २५ व रुपये ४० वरुन अनुक्रमे रुपये ७५ व रुपये १०० अशी वाढविण्यात आली आहे.

मौलाना आझाद [अ]ल्पसंख्यांक आर्थिक विकास [म]हामंडळास [भा]गभांडवल.

**२६.** मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळास शासनाने भागभांडवलापोटी रुपये ३९.६० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला असून, महामंडळाने आतापर्यंत २३.४५ कोटी इतक्या कर्जाचे वितरण केले आहे. त्याचा लाभ ३,९८३ लाभार्थ्यांना झाला आहे. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक

विकास महामंडळास भागभांडवलापोटी सन २००७-०८ या वर्षात रुपये १.५४ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**हज हाऊस करिता वित्तिय अनुदान.**

**२७.** शासनाने २००५-०६ मध्ये नागपूर येथे हज हाऊसकरिता भूसंपादन व बांधकाम यासाठी रुपये २ कोटी उपलब्ध करुन दिले होते. सन २००७-०८ या वर्षात कामाच्या प्रगतीनुसार अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**माहिती तंत्रज्ञान.**

**२८.** महाराष्ट्र स्टेट वाईड एरिया नेटवर्क प्रकल्पांतर्गत ऑप्टीकल फायबर केबलद्वारे सर्व ३५ जिल्हे मंत्रालयाशी व सर्व तालुके जिल्हा मुख्यालयाशी जोडण्यात येत आहेत. सन २००७-०८ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ रुपये १९.२० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**स्मार्ट कार्ड वाहनचालक अनुज्ञप्ती व ऑप्टीकल स्मार्ट कार्ड वाहन नोंदणी.**

**२९.** मोटार वाहन विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी व जनतेस तत्पर व उच्च दर्जाची सेवा मिळावी यासाठी स्मार्ट कार्ड वाहन चालक अनुज्ञप्ती प्रकल्प व स्मार्ट ऑप्टीकल कार्ड वाहन नोंदणीपत्र प्रकल्प राज्यात कार्यान्वित केला आहे. स्मार्ट कार्ड अनुज्ञप्ती व नोंदणी प्रणाली ही राज्यातील अनुक्रमे दहा व पाच कार्यालयात सुरु करण्यात आली आहे, या यंत्रणेचा वापर करुन अंदाजे दोन लक्ष शिकावू अनुज्ञप्ती, १.७५ लक्ष स्मार्ट कार्ड अनुज्ञप्ती तर दोन हजार स्मार्ट ऑप्टीकल कार्ड नोंदणीपत्र जारी करण्यात आली आहेत. अजून दहा कार्यालयात या दोन्ही प्रणाली सुरु करण्यात येणार आहेत. उर्वरित कार्यालयांमध्ये ही प्रणाली टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यात येईल.

**सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण.**

**३०.** सध्या अस्तित्वात असलेल्या २२ सीमा तपासणी नाक्यांच्या आधुनिकीकरण व संगणकीकरणासह ३० आधुनिक व संगणकीकृत सीमा तपासणी नाके BOT तत्वावर उभारण्यात येणार आहेत. हे तपासणी नाके मोटार वाहन, उत्पादन शुल्क व विक्रीकर विभागाकरिता सामायिक असतील. मुलभूत पायाभूत सुविधा, कार्यालयीन इमारती बांधण्यासाठी रुपये १०० कोटी खर्च अपेक्षित असून सन २००६-०७ या आर्थिक वर्षामध्ये या प्रयोजनार्थ रुपये १४ कोटी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण व संगणकीकरण केल्यामुळे महसुलामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होणार आहे. हा प्रकल्प जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने सन २००७-०८ मध्ये आवश्यक तो अतिरीक्त नियतव्यय उपलब्ध केला जाईल.

**केंद्रिय योजनेतंर्गत राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण.**

**३१.** राज्य शासनाद्वारे सन २०००-०१ पासून केंद्र शासनाच्या मदतीने पोलीस दल, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा व गृहरक्षक दल यांच्या आधुनिकीकरणाची योजना सुरु करण्यात आली आहे. यात वाहने, साधनसामुग्री, दळणवळण यंत्रणा, शस्त्रे व दारुगोळा, पोलीस कार्यालय व पोलिसांकरिता निवासस्थाने बांधणे अंतर्भूत आहे. योजना सुरु झाल्यापासून ते सन २००५-०६ पर्यंत या योजनेंतर्गत एकूण रुपये ७७७.०१ कोटी इतका खर्च झाला आहे. या वर्षात एकूण रुपये १३३.८१ कोटीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी चालू आहे. सन २००७-०८ या वर्षाकरिता या योजनेसाठी रुपये १७९.२० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**राज्य योजनेअंतर्गत पोलीस दलाचे आधुनिकीकरण.**

**३२.** पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविण्याकरिता ७५२ वाहनांची खरेदी तसेच दारुगोळा, दळणवळण सामग्री, पोलीसांकरिता निवासस्थाने व ३५ पोलीस स्टेशन्स व कार्यालये बांधण्याकरिता निधी उपलब्ध करण्यात आला आहे. या

प्रयोजनार्थ सन २००७-०८ करिता रुपये १८४.५० कोटी इतका नियतव्यय राज्याच्या साधनसंपत्तीतून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**पोलीस विभागाच्या निवासी इमारती बांधण्याबाबत.**

**३३.** महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळांकरिता सन २००७-०८ या वर्षासाठी रुपये १२० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**पोलीस दलातील अधिकारी/ कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता.**

**३४.** पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना शारीरिक क्षमता टिकविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनाने पोलीस निरीक्षक या संवर्गापर्यंतच्या कर्मचाऱ्यांना दरमहा रुपये २५० इतका प्रोत्साहन भत्ता एप्रिल २००७ पासून देण्याची योजना राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**बंदर विकास.**

**३५.** महाराष्ट्र राज्याला ७२० किलोमिटर लांबीची किनारपट्टी लाभली असून त्यावर ४८ लहान बंदरे व दोन मोठी बंदरे आहेत. या ४८ लहान बंदराचे व्यवस्थापन, विकास व प्रशासनाचे काम महाराष्ट्र शासनाच्यावतीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत करण्यात येते. लहान बंदरांचा विकास खाजगीकरणाच्या माध्यमातून बांधा, मालकी, वापरा, सहभाग व हस्तांतरण या तत्वावर करण्याचे शासनाचे धोरण आहे. याच तत्वावर रायगड जिल्ह्यातील दिघी व रेवस-आवरे या बंदरांचा विकास करण्यात येत आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड बंदराच्या विकासाकरिता विकासक कंपनीची निवड करण्यात आली आहे व लवकरच याबाबतचा करारनामा स्वाक्षांकित करण्यात येणार आहे. या

व्यतिरिक्त सिंधुदूर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग व रेडी या बंदरांसाठी विकासक निश्चित करण्यात येत आहेत.

उद्योग. **३६.** राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीस उत्तेजन देण्यासाठी व औद्योगिक क्षेत्रात भरीव रोजगार निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नुकतेच औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण, २००६ जाहीर केले आहे.

**३६.१.** कमी मनुष्यबळ विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी या धोरणामध्ये विशाल प्रकल्पाचे निकष शिथिल करण्यात आले आहेत. कमी मनुष्यबळ विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये रोजगार निर्मितीवर आधारीत अतिरिक्त प्रोत्साहने देणे याचा सुध्दा नवीन धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

**३६.२.** औद्योगिक घटकांना मंजूर केलेली आर्थिक प्रोत्साहने अदा करण्याच्या दृष्टीने पी.एल.अे. खाते उघडण्यात येईल व त्यात सन २००७-०८ मध्ये रुपये ४०० कोटी एवढा निधी उपलब्ध करण्यात येईल.

**३६.३.** प्रगतीशील औद्योगिक धोरण, उत्तम पायाभूत सुविधा आणि नवीन उद्योग व व्यापार उभारणीकरिता अनुकूल वातावरण यांच्या बळावर महाराष्ट्र शासनाने भारतीय तसेच विदेशी गुंतवणूकदारांचे प्रथम पसंतीचे राज्य म्हणून आपला लौकिक कायम राखला आहे. महाराष्ट्रात सन १९९१ पासून औद्योगिक आवेदन पत्रे आणि इरादा पत्रे यांची एकत्रित संख्या १३,५९४ इतकी असून त्यामधून ३,१३,७२९ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे २२ लक्ष रोजगार निर्मिती क्षमता आहे. ऑगस्ट १९९१ ते सप्टेंबर २००६ या कालावधीत राज्यात

रुपये ५६,८८० कोटी इतक्या रकमेचे ३,९१२ थेट विदेशी गुंतवणूकीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

**विशाल प्रकल्प धोरण.** **३७.** माझ्या गेल्या वर्षीच्या भाषणात नमूद केल्याप्रमाणे शासनाने घोषित केलेल्या विशाल प्रकल्प धोरणाला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. राज्याने विदेशी गुंतवणूकीमध्ये पहिला क्रमांक राखला असून गेल्या दिड वर्षाच्या काळामध्ये रुपये ४३,००० कोटी एवढी निश्चित गुंतवणूक असलेले ३८ विशाल प्रकल्प आकर्षित केलेले आहेत. या प्रकल्पांपैकी बोईंग, जनरल मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा, वॉक्स व्हॅगन इत्यादी प्रकल्प विशेष उल्लेखनीय आहेत. इन्स्टीटयुट फॉर मॅनेजमेंट डेव्हलपमेंट, स्वित्झलँड या संस्थेच्या मुल्यांकन अहवालामध्ये भारताच्या व्यतिरिक्त स्थान मिळालेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. सन २००६ च्या अहवालात महाराष्ट्राचे स्थान ४२ वरुन ३७ असे उंचावले असून ते इटली, दक्षिण कोरीया, दक्षिण आफ्रिका, रशिया, इंडोनेशिया इत्यादी विकसित देशांपेक्षा वरचे आहे. त्यामुळे राज्य शासनाने घेतलेल्या पुढाकाराने मिळालेल्या यशावर शिक्कामोर्तब झाले आहे

**वीज निर्मिती कार्यक्रम.** **३८.** ऊर्जा क्षेत्रातील विजेची उपलब्धता व मागणी यांच्यातील तफावतीमुळे राज्यातील जनतेला होणाऱ्या अडचणीची शासनास पूर्ण जाणीव आहे व परिस्थितीवर त्वरीत मात करण्याचा प्रयत्नही सुरु आहे. परळी व पारस औष्णिक प्रकल्पामधून लवकरच ५०० मेगावॅट वीज उपलब्ध होत आहे. पुढील काही महिन्यात रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट लिमिटेड मधून मिळणाऱ्या ७४० मेगावॅट विजेत वाढ करुन ती २,१५० मेगावॅट करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पुढील ५ वर्षात २५० मेगावॅट क्षमतेचे परळी व पारस येथील विस्तारित प्रकल्प,

चंद्रपूर व खापरखेडा विस्तारित युनिट-२ हे ५०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प व १,००० मेगावॅट क्षमतेचे कोराडी व भुसावळ विस्तार युनिट-२ हे प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील.

**३८.१.** तसेच परळी, पारस, कोराडी व भुसावळ या प्रकल्पांच्या नूतनीकरणामधून ५८५ मेगावॅट वीज उपलब्ध होईल. धोपावे व उरण या प्रकल्पामधून अनुक्रमे १,६०० मेगावॅट व १,०४० मेगावॅट वीज उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या विद्युत प्रकल्पांमधून व आंतरराज्य विद्युत प्रकल्प यामधून सुमारे २,८९४ मेगावॅट वीज व मुंद्रा अल्ट्रा मेगा पॉवर प्रोजेक्ट मधून ८०० मेगावॅट वीज उपलब्ध होईल. तसेच स्पर्धात्मक निविदेमधून वितरण कंपनीद्वारा अतिरिक्त वीज खरेदी करण्याचेही प्रस्तावित आहे.

**३८.२.** १२,५०० मेगावॅट इतकी वीज निर्मिती क्षमता असणाऱ्या प्रस्तावित ८ खाजगी वीज निर्मिती प्रकल्पांमधून राज्यास ४,००० मेगावॅट इतकी वीज प्राप्त होणे अपेक्षित असून याकरिता सामंजस्य करारही करण्यात आले आहेत.

**३८.३.** वीज क्षेत्रासाठी सन २००७-०८ या वर्षाकरिता रुपये १२८२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला असून, वीज निर्मिती कार्यक्रमाकरिता रुपये ६९२ कोटी इतका भरीव नियतव्यय निश्चित करण्यात आला आहे.

**वीज बचत.** **३९.** वीज बचत व वीजेचा सर्वांसाठी सुयोग्य व पूरेपूर पुरवठा करण्याच्या दृष्टीकोनातून वितरण प्रणालीव्दारे खालील योजना राबविण्यात येत आहेत :—

**३९.१.** सिंगल फेजिंग योजना राज्यातील ९,११४ खेडयामध्ये लागू करण्यात आलेली असून त्यामुळे सुमारे १,२७० मेगावॅट इतक्या भाराचे व्यवस्थापन करणे शक्य झाले आहे.

**३९.२.** गावठाण फिडर सेपरेशन योजनेअंतर्गत ७,१७६ खेडयांमधील फिडर सेपरेशनचे काम प्रस्तावित आहे. यामुळे गावठाणातील भारनियमनाचा कालावधी कमी होण्यास मदत होईल.

**न्यायालयांना मूलभूत सुविधा पुरविणे बाबतची केंद्रपुरस्कृत योजना.**

**४०.** न्यायालयांना मूलभूत सुविधा पुरविणेबाबतची केंद्रपुरस्कृत योजना शासनामार्फत राबविली जाते. या योजनेमध्ये न्यायालयीन इमारती, न्यायाधिशांकरिता निवासस्थाने बांधण्यात येतात, तसेच भूसंपादनही करण्यात येते.

**४०.१.** सन २००६-०७ मध्ये या योजनेसाठी केंद्र शासनाने रुपये ४.१६ कोटी निधी उपलब्ध करुन दिला असून राज्य शासनाने रुपये २५.८४ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामधून १६३ चालू कामे व ८ नवीन कामे हाती घेण्यात आली. त्यापैकी ६८ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. सन २००७-०८ या वर्षाकरिता सदर प्रयोजनार्थ रुपये ४० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यामधून १०३ चालू असलेल्या कामांसाठी व काही नवीन कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**दहाव्या पंचवार्षिक योजनेत सुरु करण्यात आलेल्या नवीन योजना.**

**४१.** दहाव्या पंचवार्षिक योजनेत लातूर, अकोला व कोल्हापूर येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यात आली आहेत. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे नवीन बाह्यरुग्ण विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व संशोधन केंद्र, नागपूर येथे इतर नागरी सुविधा सुरु करण्यात आल्या आहेत. नागरी स्वास्थ्य आरोग्य केंद्र, बांद्रा, मुंबई येथील खाटांची संख्या १० वरुन ५० पर्यंत वाढविण्यात आली आणि एका नवीन मजल्याचे बांधकाम करण्यात आले आहे.

**वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये यांचे बळकटीकरण.**

**४२.** राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षण व रुग्णांचे संगोपन यांच्या संदर्भातील गरजा भागविण्यासाठी अतिरिक्त नवीन व उच्च दर्जाच्या आधुनिक यंत्रसामग्रीची खरेदी करण्यासाठी रुपये ३०.४३ कोटी एवढा नियत व्यय सन २००७-०८ मध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे.

**रोजगार हमी योजना.**

**४३.** सन २००६-०७ या वर्षात रोजगार हमी योजनेवरील फेब्रुवारी २००७ अखेरपर्यंत एकूण खर्च रुपये ५७८.९१ कोटी इतका असून त्याव्दारे ८.२७ कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्मिती झाली आहे.

**४३.१.** दिनांक २ फेब्रुवारी, २००६ पासून राज्यातील १२ जिल्हयांत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यास सुरुवात झाली आहे. जानेवारी, २००७ अखेर, या योजनेंतर्गत एकूण रुपये १६७.३३ कोटी इतका खर्च झाला आहे.

**४३.२.** सन २००७-०८ साठी रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेकरिता एकूण रुपये १,००० कोटी तरतूद करण्यात आली आहे. यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल.

**खाजगीकरणाच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या प्रकल्पांची सद्य:स्थिती.**

**४४.** शासनाने राज्यातील राज्य महामार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गांचा विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी रुपये २१,१७५ कोटी रकमेचे १६९ प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून हाती घेतले आहेत. यापैकी रुपये ३,८६२ कोटींचे ९० प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. तर रुपये ३,६१० कोटींचे २६ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. या व्यतिरिक्त रुपये १३,७०१ कोटींचे ५३ प्रकल्प नियोजनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहेत. राज्य शासनाने प्रकल्प वर्धनक्षम होण्याकरिता लागणारा निधी उपलब्ध करण्याचे देखील ठरविले आहे.

**रस्ते विकास कार्यक्रम.** **४५.** राज्यातील ४०,४१२ गावांपैकी ३८,४८३ गावे बारमाही रस्त्याने जोडली गेली आहेत. त्याचप्रमाणे २,३१,४२८ किलोमिटरपैकी १,१८,४१० किलोमिटर लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण झालेले आहे. सन २००७-०८ या वर्षात ५,५०० किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे लक्ष्य आहे.

**४५.१.** रस्ते विकास कार्यक्रमासाठी सन २००७-०८ या वर्षाकरिता एकूण रुपये १,४३७.५७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान.** **४६.** राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान देशामध्ये दिनांक १२ एप्रिल २००५ पासून सुरू झाले आहे. या अभियानाचे उद्दिष्ट लोकांना परवडण्याजोगी व गुणात्मक आरोग्य सेवा पुरविणे हे असून यामध्ये महिला व बालकांवर व इतर दुर्लक्षित समाजाच्या घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**४६.१.** या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण स्तरावर आरोग्य कर्मचाऱ्यांचा "आशा" हा नवीन संवर्ग स्थापन करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत नव्याने निर्माण केलेल्या रुग्णकल्याण समितीद्वारे ग्रामीण रुग्णालय व आरोग्य केंद्राचे व्यवस्थापन पाहण्यात येईल. आरोग्याशी संबंधित सर्व योजनांचे समावेशन ग्रामपंचायत स्तरावरील आरोग्य व स्वच्छता समित्याद्वारा करणे अपेक्षित आहे. या अभियानातंर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून सन २००६-०७ या वर्षात रुपये ६.६७ कोटी इतका खर्च झाला असून, सन २००७-०८ या वर्षाकरिता सदर प्रयोजनार्थ केंद्र शासनाकडून रुपये १७०.७० कोटी इतका निधी अपेक्षित आहे.

**जीवनदायी आरोग्य योजना.** **४७.** जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील लोकांना हृदयविकार, मूत्रपिंडरोपण, मेंदू व मज्जासंस्थाच्या गंभीर विकारावरील उपचाराकरिता प्रतिरुग्ण कमाल

रुपये ७०,००० इतके अर्थसहाय्य देण्यात येत होते. या विकारांमध्ये कर्करोग या आजाराचा समावेश करण्यात आला असून अर्थसहाय्याची मर्यादा रुपये १,५०,००० पर्यंत वाढविण्यात आली आहे. सन २००७-०८ या वर्षाकरिता सदर प्रयोजनार्थ राज्य योजनेतंर्गत रुपये १५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे

**राज्यातील वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविणे.**

**४८.** महाराष्ट्राच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी अंदाजे २०.१३ टक्के इतके वनक्षेत्र आहे. वनीकरणाच्या विविध योजनांच्या माध्यमातून अंदाजे ४०,००० हेक्टर वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविण्याचे प्रस्तावित आहे. सन २००७-०८ मध्ये या योजनांकरिता रुपये २०.८५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक उपयोगासाठी झाडांची लागवड, निकृष्ट वनांचे पुनर्वनीकरण, भरीव वनीकरण, गौण वनोपजांचा विकास इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**निसर्ग वनपर्यटन.**

**४९.** वानिकी क्षेत्रामध्ये पर्यटनाला चालना दिल्याने जनतेमध्ये पर्यावरण जागृती निर्माण होते. या प्रयोजनार्थ सन २००७-०८ मध्ये रुपये ११ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**संयुक्त वनव्यवस्थापन.**

**५०.** राज्यामध्ये अनेक गांवे वनांच्या सीमेवर आहेत. या गावांमधील जनतेचा वनांच्या संरक्षण व संवर्धन कामांमध्ये सहभाग वाढविणे यासाठी सदर कार्यक्रम राबविण्यात येतो. याव्दारे मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होते व तेथील जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. सन २००७-०८ मध्ये या योजनेसाठी रुपये १०.६७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**५०.१.** वन विभागास कार्य आयोजनाची कामे पूर्ण करण्यासाठी सन २००७-०८ मध्ये रुपये ८३ कोटी एवढी अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे वनांचे शास्त्रीय व्यवस्थापन करत असतानाच स्थानिक जनतेस रोजगार उपलब्ध करुन देणे शक्य होईल व राज्याच्या साधनसंपत्तीतही भर पडेल.

**२००६ मधील अतिवृष्टी व पूर.**

**५१.** गेल्या वर्षी प्रमाणेच यावर्षीही जुलै-ऑगस्ट २००६ च्या दरम्यान राज्यात अतिवृष्टी व धरणातील अतिरिक्त पाणी सोडल्यामुळे राज्यात पूर परिस्थिती निर्माण झाली. हे अतिवृष्टीचे दुसरे वर्ष आहे. सदर आपत्तीमध्ये अनेक माणसांची आणि जनावरांची जिवित हानी तसेच सार्वजनिक तसेच पायाभूत सुविधाचे नुकसान झाले आहे. ४२३ व्यक्ती, ८,७९७ जनावरे मृत्यूमुखी पडली. एकूण ७.८६ लाख हेक्टर पिक शेतीचे नुकसान झालेले आहे. १३,०६२ खेड्यात पसरलेली ४.९७ लाख कुटुंबे या अतिवृष्टीमुळे बाधित होऊन २१.१४ लाख लोकांना झळ पोहचली.

**बचाव व मदत कार्य.**

**५२.** अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीत शासकीय यंत्रणेने सैन्य दल, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने बचाव कार्य सक्षमतेने आणि यशस्वीपणे हाताळले. राज्यातील सुमारे ७.६४ लाख लोकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले. राज्यभरात १,५४० तात्पुरत्या छावण्यामध्ये ६.५६ लाख नागरिकांची व्यवस्था करण्यात आली. ४.९७ लाख कुटुंबांना ६९,२६० क्विंटल्स अन्नधान्य व ३,४०७ किलोलिटर्स केरोसिनचे मोफत वाटप केले. या व्यतिरिक्त रुपये ६८.९८ कोटी सानुग्रह अनुदानाचे वाटप केले.

**५२.१.** अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३१ जिल्हयातील सार्वजनिक सुविधा तातडीने पूर्ववत होण्यासाठी रुपये १०५ कोटीचे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. मृत व्यक्तींच्या

वारसांना प्रत्येकी रुपये १ लाख याप्रमाणे मदतीचे वाटप करण्यात आले आहे. मृत जनावरांच्या मालकांना एकूण रुपये २.३५ कोटीचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

**५२.२.** ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले आहे त्यांना रुपये ४७३ कोटीचे अनुदान उपलब्ध करुन दिले गेले. अतिवृष्टीमुळे अशंतः व पूर्णतः नुकसान झालेल्या घरांच्या दुरुस्ती व पुनर्बांधणीसाठी रुपये ९०.९७ कोटी अनुदान उपलब्ध करण्यात आले. या नैसर्गिक आपत्तीमध्ये राज्यातर्फे एकूण रुपये १,२४० कोटीचा खर्च अपेक्षित असून केंद्र शासनाकडून रुपये ४१८ कोटीची मदत प्राप्त झालेली आहे. उर्वरित रुपये ७२२ कोटीच्या खर्चाचा भार राज्य शासनावर येणार आहे.

**चक्रीवादळ धोका निवारण प्रकल्प.**

**५३.** सन २००७-०८ मध्ये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राष्ट्रीय चक्रीवादळ धोका निवारण प्रकल्प राबविण्यासाठी निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या प्रकल्पाचा फायदा प्रमुखतः राज्याच्या किनारपट्टीवरील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व बृहन्मुंबई या जिल्ह्यांना मिळेल. या प्रकल्पाकरिता सन २००७-०८ मध्ये राज्य हिश्श्यापोटी रुपये १२.५३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प.**

**५४.** पाटबंधारे प्रकल्पांसाठी सन २००५-०६ या वर्षात रुपये ३,९६७ कोटी इतका खर्च आणि सन २००६-०७ साठी रुपये ३,६३४ कोटी अशी भरीव तरतुद शासनाने केली आहे. त्यातून सन २००५-०६ मध्ये ९४ हजार हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे व सन २००६-०७ मध्ये २.१० लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती होणार आहे. सन २००७-०८ मध्ये रुपये ३,८२८.७७ कोटी इतक्या नियतव्ययातून सुमारे २ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

**महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प.**

**५५.** रुपये १,८६० कोटी इतक्या रकमेच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाच्या पहिल्या वर्षात संस्थात्मक संरचना व बळकटीकरणावर भर देण्यात आला आहे. एकूण १,३०० पाणी वापर संस्था स्थापन झाल्या असून त्यांचे पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षणही पूर्ण झाले आहे. सन २००७-०८ मध्ये या प्रयोजनार्थ रुपये ४३८ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम.**

**५६.** केंद्र शासनाने वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमासाठीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसृत केल्या असून, त्या डिसेंबर २००६ पासून अंमलात आल्या आहेत. त्यात अवर्षणप्रवण क्षेत्र आणि आदिवासी भागाला तसेच पंतप्रधानांनी घोषित केलेल्या सहा आपदग्रस्त जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे. अवर्षणप्रवण क्षेत्र आणि आदिवासी भागाला लाभ देणा-या प्रकल्पांसाठी केंद्र शासन प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के रक्कम अनुदान स्वरुपात उपलब्ध करणार आहे

**५६.१.** सन २००६-०७ मध्ये प्रथमच लघु पाटबंधारे प्रकल्पांचा अंतर्भाव या कार्यक्रमांतर्गत करण्यात आला असून यासाठी रुपये ३१० कोटीचा निधी २ वर्षात राज्य शासनाला मिळणार आहे

**५६.२.** तसेच सन २००७-०८ मध्ये सुधारित मार्गदर्शक तत्वांचा पूर्ण लाभ घेण्याच्या दृष्टीने रुपये १,४०० कोटीचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्यातून सुमारे रुपये ८५० कोटीचे केंद्रीय सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न आहे.

**जलविद्यूत प्रकल्प.**

**५७.** सन २००६-०७ मध्ये जलविद्युत प्रकल्पांवरील भांडवली खर्चाकरिता रुपये ३०० कोटी इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला असून, सन २००७-०८ साठी सदर प्रयोजनार्थ रुपये ६५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**५७.१.** सरदार सरोवर हा महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश व राजस्थान ह्या राज्यांबरोबरचा संयुक्त असा बहुउद्देशिय प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाची एकूण स्थापित क्षमता १,४५० मेगावॅट इतकी असून त्यापैकी नर्मदा जलविवाद लवादानुसार महाराष्ट्राचा वाटा ३९१.५० मेगावॅट (२७%)आहे.या प्रकल्पातून वीज निर्मिती सुरू झाली आहे.

**खारभूमी विकास योजना.** **५८.** सन १९८१-८२ पासून खारभूमी विकास कार्यक्रमांतर्गत डिसेंबर २००६ अखेर एकूण रुपये ७५.४० कोटी एवढा खर्च झाला आहे. त्यामधून एकूण ३५४ खारभूमी योजना पुर्ण झाल्या असून ३८,२९० हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित करण्यात आले आहे. ३० खारभूमी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. या योजना पुर्ण झाल्यावर २,८३३ हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित होणार आहे. सन २००६-०७ या वर्षात या योजनेवर रुपये १२.२७ कोटी इतका खर्च झाला असून सन २००७-०८ साठी सदर प्रयोजनार्थ रुपये २० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**इंदिरा आवास योजना.** **५९.** ग्रामीण दारिद्र्य रेषेखालील आसराहीन कुटुंबांकरिता केंद्र सहाय्यित असलेली इंदिरा आवास योजना राज्याद्वारे राबविण्यात येते. सन २००५-०६ मध्ये ७८,४७८ इतक्या लक्ष्याच्या तुलनेत ९४,२७४ घरकुले पूर्ण केली आहेत. सन २००६-०७ मध्ये ८३,४३० घरकुले बांधण्याचे लक्ष्य निर्धारित असून, एकूण रुपये २६६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. सन २००७-०८ साठी सदर योजनेकरिता रुपये १२१ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे

**एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम.** **६०.** राज्यातील एकूण ३५६ तालुक्यांपैकी घोषित केलेल्या १४८ अवर्षण प्रवण तालुक्यात अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम पाणलोट विकासाच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २००६-०७ मध्ये केंद्र हिस्सा म्हणून रुपये १७.६८ कोटी प्राप्त झालेले आहे. सन २००७-०८ साठी

या कार्यक्रमाकरिता राज्याच्या हिश्श्यापोटी रुपये ६.६६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**विदर्भ पाणलोट विकास मिशन.**

**६१.** विदर्भात भौगोलिक तथा इतर कारणांमुळे निर्माण झालेल्या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी तसेच शेतीकरिता पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी कृषि-औद्योगिक व त्या अनुषंगिक कुटीर उद्योगाचा विकास करुन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी विदर्भातील नागपूर व अमरावती विभागांसाठी विदर्भ पाणलोट मिशनची स्थापना दिनांक २८ फेब्रुवारी २००६ रोजी करण्यात आली आहे. सन २००५-०६ करिता रुपये २ कोटी व सन २००६-०७ या आर्थिक वर्षात रुपये ९५ कोटी इतका निधी मिशनसाठी वितरीत केलेला आहे. सन २००७-०८ या वर्षाकरिता सदर प्रयोजनार्थ रुपये ५ कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**भारत निर्माण ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम.**

**६२.** भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने ग्रामीण भागातील सर्व वस्त्या व शाळांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्च २००९ पर्यंत सोडविण्यास प्राधान्य दिले आहे. त्यानुसार २२,७३८ वस्त्यांसाठी रुपये २,४५५.३५ कोटी इतक्या रकमेचा कृती आराखडा केंद्र शासनास सादर केला असून भारत निर्माण कार्यक्रमाखाली वर्धित वेग ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम, स्वजलधारा, महाजल इत्यादी विविध स्त्रोतातील निधीतून पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहेत.

**६२.१.** सन २००६-०७ मध्ये केंद्र शासनाने रुपये ३६१ कोटी नियतव्यय मंजूर केला असून १२,५८१ गावे आणि वाड्यात पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा योजना.

**६३.** ग्रामीण पाणीपुरवठा योजनेकरिता सन २००७-०८ साठी रुपये ८७१.९६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

अनुसूचित जाती उपयोजना.

**६४.** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी अनुसूचित जाती उपयोजना राबविली जाते. सन २००५-०६ या वर्षापासून राज्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या एकूण वार्षिक योजनेच्या १०.२० टक्के एवढा निधी अनुसूचित जाती उपयोजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात येतो. सन २००५-०६ साठी रुपये १,१२२ कोटी, सन २००६-०७ साठी रुपये १,५९२ कोटी आणि २००७-०८ या वर्षाकरिता रुपये २,०६० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण फी, परीक्षा फी व इतर शुल्काची प्रतिपूर्ती.

**६५.** खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालये व अध्यापक विद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनाही शासकीय दराने शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन २००७-०८ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ रुपये ३३.३९ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

**६६.** इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मधील प्रत्येक इयत्तेत ५० टक्केहून अधिक गुण मिळविणाऱ्या गुणवत्ताधारक पहिल्या दोन अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दरमहा अनुक्रमे रुपये २० व रुपये ४० इतकी शिष्यवृत्ती देण्यात

येत होती. या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करुन सदर शिष्यवृत्ती अनुक्रमे दरमहा रुपये ५० व रुपये १०० इतकी करण्यात आली आहे.

**आदिवासी उपयोजना.** **६७.** अनुसूचित जमाती तसेच आदिम जमातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी आदिवासी उपयोजना राबविली जाते. सन २००५-०६ साठी राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राज्य योजनेतून नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २००५-०६ साठी रुपये ९९० कोटी, सन २००६-०७ साठी रुपये १,३८९ कोटी व सन २००७-०८ साठी रुपये १,७९८ कोटी एवढा नियतव्यय आदिवासी उपयोजनेसाठी राज्य योजनेतून उपलब्ध करुन दिलेला आहे.

**आदिवासींना गॅस युनिट पुरविणे.** **६८.** शासनाने अनुसूचित जमातीच्या कुटुंबासाठी घरगुती गॅस पुरविण्याची योजना सुरु केली असून, या योजने अंतर्गत सन २००६-०७ ते २००९-१० या कालावधीत दारिद्र्य रेषेखालील चार लाख अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना घरगुती गॅस पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी सन २००६-०७ मध्ये रुपये ३० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली असून २००७-०८ या वर्षाकरिता रुपये ४० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**आदिवासींना दुधाळ जनावरांचा/शेळयांचा गट पुरविणे.** **६९.** शासनाने सन २००६-०७ ते २००९-१० या कालावधीत दारिद्र्य रेषेखालील १ लक्ष अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना दुधाळ जनावरांचा व शेळयांचा गट पुरविण्याची योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेसाठी सन २००६-०७ मध्ये रुपये ८८.५० कोटी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून, सन २००७-०८ मध्ये रुपये ९० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठी दोन जादा समित्या तसेच समित्यांचे बळकटीकरण.**

**७०.** राज्यात अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्र तपासणीसाठी सहा समित्या कार्यरत आहेत. या समित्यांकडील वाढती प्रलंबित प्रकरणे विचारात घेऊन या समित्यांवर सहा सहआयुक्त दर्जाची पदे निर्माण करण्यात आली असून ते पूर्णवेळ उपाध्यक्ष म्हणून समितीचे काम पाहतील. त्यामुळे आता वैधता प्रमाणपत्रे तातडीने निर्गमित करता येतील. तसेच शासनाने नंदूरबार व गडचिरोली येथे दोन नवीन प्रमाणपत्र तपासणी समित्या स्थापन केल्या आहेत.

**तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम.**

**७१.** राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून सक्षम करण्याकरीता तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत आठ वर्षामध्ये एकूण ६२,६७५ महिला स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे. सन २००७-०८ साठी या प्रयोजनार्थ रुपये ५.४३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**पर्यटन धोरण.**

**७२.** महाराष्ट्राच्या विस्तीर्ण सागरकिनाऱ्यावरील सुंदर चौपाटया, राज्यभरातील किल्ले, धार्मिक स्थळे, जागतिक किर्तीच्या लेण्या, नैसर्गिक सौंदर्य, अभयारण्ये या सर्व बाबींचा विचार केल्यास महाराष्ट्र हे दक्षिण आशियातील पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनू शकते. हे लक्षात घेऊन राज्य शासनाने पर्यटन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचे ठरवून यासाठी नवे पर्यटन धोरण २००६ जाहीर केले आहे. पर्यटन प्रकल्पाच्या ठिकाणानुसार सदर क्षेत्रांना ऐषआराम कर, करमणूक कर, मुद्रांक शुल्क इत्यादी करांमधून क्षेत्रनिहाय सवलती दिल्या आहेत. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सागरी किनारा व सृष्टी पर्यटन विकास या बाबींकरीता राज्य शासनास सन २००६-०७ पासून

पुढील चार वर्षात प्रतिवर्षी रुपये ६२.५० कोटी प्राप्त होणार आहेत. राज्यात नवे प्रकल्प सुरु करुन त्यामध्ये धामापूर, तारकर्ली, पवनी, नागपूर-नागभीड ट्रेन, दिवे-आगर, वेळणेश्वर इत्यादी प्रकल्प केंद्र शासनाच्या सहाय्याने राबविण्यात येतील. पर्यटन विकासांतर्गत जपान शासनाच्या मदतीने वेरुळ-अजिंठा येथील विकासकामे करण्यात येत आहेत. पर्यटन क्षेत्रासाठी सन २००६-०७ मध्ये रुपये १६० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सन २००७-०८ करिता रुपये १६३ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**सांस्कृतिक वारसा जतन.**

**७३.** बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सांस्कृतिक वारसा जतन यासाठी केंद्र शासनाकडून पुढील ४ वर्षात एकूण रुपये ५० कोटी इतका निधी प्राप्त होणार आहे. या निधीमधून राज्यातील संरक्षित स्मारकाचे जतन आणि दुरुस्तीची कामे मोठया प्रमाणात हाती घेण्यात येणार आहेत. सन २००६-०७ च्या कृती आराखड्यात मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया व बाणगंगा तलाव यांच्या संवर्धनाचा खर्च अंतर्भूत आहे. केंद्र शासनाकडून अन्य योजनेखाली प्राप्त होणाऱ्या निधीतून पर्यटन व पुरातत्त्व विभागामार्फत मुंबई जिल्ह्यातील बांद्रा, शिवडी, वरळी व ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर किल्ल्यांच्या जतन व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येतील.

**नगर विकासाच्या योजनांसाठी तरतूद.**

**७४.** राज्यातील नागरी भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता शासनाने नगर विकास विभागाच्या योजनांसाठी मोठया प्रमाणात निधीची तरतूद केली असून सन २००७-०८ साठी रुपये २,२०३ कोटीचा योजनांतर्गत नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान.**

**७५.** केंद्र शासनाकडून दिनांक ३ डिसेंबर २००५ रोजी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान घोषित करण्यात आले असून ते राज्यातील मोठया शहरांसाठी सन २००५-०६ पासून सात वर्षाच्या कालावधीसाठी अंमलात राहील. या अभियानांतर्गत पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते इत्यादी नागरी पायाभूत सुविधांसाठी अनुदान मिळविण्याकरिता या पाच नागरी समुहातील मुंबई, मिरा भाईंदर, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नागपूर व नांदेड या महापालिका व अंबरनाथ, बदलापूर व भगूर या नगरपालिकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत केंद्र शासनाने रुपये ५,८३२ कोटींचे ६१ प्रकल्प मंजूर केले असून पहिला हप्ता म्हणून रुपये ३५६ कोटी वितरीत केले आहेत. या अभियानाखाली राज्य शासनाचा संपूर्ण हिस्सा देण्यास शासन कटीबध्द असून त्याकरिता सन २००७-०८ करिता रुपये ४०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**७५.१.** केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान कार्यक्रमा अंतर्गत परवडणाऱ्या सदनिका उपलब्ध करुन देण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनाने हाती घेण्यात आलेला आहे. आतापर्यंत केंद्र शासनाने शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (बीएसयुपी) या योजनेंतर्गत मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, नांदेड, नवी मुंबई व ठाणे या शहरांमध्ये १,०५,९७८ नवीन घरांच्या बांधकामांसाठी मंजुरी दिलेली आहे. केंद्र शासनातर्फे प्रत्येक घरकुलासाठी ५० टक्के अनुदान दिले जाईल. सर्वसाधारण प्रवर्गाच्या लाभार्थींनी घराच्या किंमतीपोटी १२ टक्के व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, शारिरीक अपंग व इतर दुर्बल घटकातील लाभार्थींनी १० टक्के स्वत:चा सहभाग देणे बंधनकारक आहे.

उर्वरित रक्कम राज्य शासनातर्फे उपलब्ध करुन दिली जाईल. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी या योजनेकरिता आवश्यक असलेली जमीन विनामूल्य उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

**मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा १ व २.**

**७६.** मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांनी संयुक्तपणे जागतिक बँकेच्या सहाय्याने रुपये ४,५२६ कोटीचा मुंबई नागरी परिवहन प्रकल्प हाती घेतला आहे. सदर प्रकल्पामध्ये रेल्वे प्रकल्प, रस्ते प्रकल्प व प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाच्या कामाचा समावेश आहे.

**७६.१.** सदर प्रकल्पाचे काम सन २००८ मध्ये पूर्ण होईल, असे अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे प्रवासी वाहन क्षमतेत ३५ टक्के वाढ होईल व मुंबईकरांचा प्रवास सुसह्य होण्यास मदत होईल.

**७६.२.** मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१ च्या अंमलबजावणीनंतरही प्रवासीक्षमतेत वाढ करण्याची गरज लक्षात घेता मुंबई रेल्वे विकास महामंडळाने शासनास सादर केलेल्या रुपये ६,५५३.३९ कोटी इतक्या खर्चाच्या मुंबई नागरी परिवहन टप्पा-२ (रेल्वे घटक) ला शासनाने मान्यता दिलेली आहे. या संदर्भात मुंबई रेल्वे विकास महामंडळाने शासनास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ (रेल्वे घटक) चा सुधारीत प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्ताव शासनाच्या सक्रिय विचाराधिन आहे.

**मिठी नदी विकास व संरक्षण प्रकल्प.**

**७७.** मुंबईत पुनःश्च पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी मिठी नदीचा विकास व संरक्षण करण्याकरीता शासनाने मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण स्थापन केले आहे. प्राधिकरणाने पहिल्या टप्प्यात मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण

व सौदर्यीकरणाचे काम हाती घेतलेले असून या प्रकल्पावर रुपये ५५ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्यातील कामास लवकरच सुरुवात होणार असून या प्रकल्पावर अंदाजे रुपये ८०० कोटी इतका खर्च होणार आहे. या दोन्ही टप्प्यातील ४६ हजार बाधित कुटुंबियांपैकी ७ हजार कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

**मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प.** ७८. मुंबई महानगरातील जनतेला आरामदायी व जलद वाहतुक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने १४६ किलोमिटर लांबीचा रुपये २०,००० कोटीचा मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या रुपये २,३५६ कोटीच्या मार्गाच्या कामास सुरुवात करण्यात आली असून शासनाने कुलाबा-माहिम-चारकोप या ३८.२४ किलोमिटर, तसेच चारकोप-बांद्रा-मानखुर्द या ३१.८७ किलोमिटर लांबीच्या कामासही मान्यता दिली आहे.

**उड्डाणपूल.** ७९. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभुत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने शासनाने मुंबई शहरात नव्याने १६ उड्डाणपूल बांधण्याचे योजिले आहे. त्याची किंमत रुपये ४२१ कोटी इतकी आहे. या उड्डाणपूलांमुळे द्रुतगती महामार्गावरील वाहतुकीची कोंडी मोठया प्रमाणावर कमी होण्यास मदत होईल.

**मुंबई शहराचा विकास.** ८०. मुंबई शहर हे जागतिक दर्जाचे शहर व्हावे अशी महत्वाकांक्षा बाळगून सुमारे तीन वर्षापूर्वी भारताच्या पंतप्रधानांपुढे आम्ही सुमारे रुपये ३६,००० कोटींचे प्रकल्प मांडले. प्रथमच केंद्र शासनानेही मुंबईच्या विकासासाठी अर्थ सहाय्य करण्याची तयारी दर्शविली. आतापर्यंत राज्य शासनाने सुमारे रुपये २१,४०० कोटींचे प्रकल्प केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर केले आहेत.

यापैकी रुपये १०,४०० कोटीच्या प्रकल्पांना केंद्र शासनाने मान्यता दर्शविली आहे. यामधील मध्य वैतरणा पाणीपुरवठा प्रकल्प, मुंबई मलःनिस्सारण प्रकल्प व दोन उड्डाण पूलांना जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण प्रकल्पातून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. बृहन्मुंबई जलनिःस्सारण प्रकल्पासही (ब्रिमस्टोवॅड) केंद्र शासनाने १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली आहे.

**८०.१.** शिवडी-न्हावा जलसेतू प्रकल्प हा कोणतीही शासकीय गुंतवणूक न करता पुर्ण करण्याचा आमचा मानस आहे. या कामी वित्तीय निविदा प्राप्त झाली असून त्यावर लवकरच निर्णय घेण्यात येईल.

**८०.२.** मुंबई शहराबरोबरच मुंबईवर अवलंबून असलेल्या सभोवतालच्या परिसराचा विकास करण्याचा मनोदय मी गेल्या अर्थसंकल्पीय भाषणात व्यक्त केला होता. हा प्रारुप आराखडा तयार करण्याचे काम आता पूर्ण होत आले आहे. या भागातील लोक प्रतिनिधींशी चर्चा करुन हा आराखडा अंतिम करण्यात येईल.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग-२ कडे वळत आहे.